# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Pali

## Assignment

### Session: 2021-2022

### Subject: Pali Compulsory

Page No.
Date :

Name : Miss Chetna Rajendra Damle

Subject : pali literature

Class : B.A. IInd year (IIIrd sem)

College : Yashoda Girls Arts and Commerce College, Nagpur

Adress : Rameshwari road parvati Nagar, Nagpur

Mobile no. : 8177934294

E-mail ID : chetanadamle@gmail.com

Signature : C.R. Damle

Academic Session : 2021-2022

Lecturer : Rashmi L. Narnaware

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sakkardara(?) Nagar, Nagpur-15

SEAL

R. Narnaware

Page No.
Date :

प्र.१ला रठ्ठपाल सुत्ताचा सारांश लिहा.

उत्तर संदर्भ : रठ्ठपाल सुत्तामध्ये रठ्ठपालाच्या प्रव्रज्जेविषयी सांगितले आहे.

स्पष्टीकरण : रठ्ठपाल सुत्तामध्ये राष्ट्रपालाच्या गृहत्यागाचे वर्णन केलेले आहे. भगवान बुद्ध एकदा मोठ्या भिक्खुसंघाबरोबर चारिका करीत थुल्लकोट्ठित नावाच्या कुरु लोकांच्या गावी पोहोचले. भगवंतांचा कल्याणकारी उपदेश ऐकण्यासाठी थुल्लकोट्ठितवासी ब्राम्हण गृहपती एकत्रीत झाले. भगवंतांनी त्यांना धार्मिक कथा सांगून प्रेरित केले.

त्यावेळी रठ्ठपालसुद्धा त्या परिषदेत बसून भगवंतांचा परिशुद्ध धम्म ऐकत होता. तेव्हा त्याच्या मनात असा विचार आला की, भगवंताचा धम्म हा अत्यंत परिशुद्ध असल्यामुळे घरात राहून ब्रम्हचर्याचे पालन करणे शक्य नाही. म्हणून राष्ट्रपाल भगवंताकडे प्रव्रज्या व उपसंपदा घेण्याची इच्छा व्यक्त करतो. तेव्हा भगवंत त्याला अगोदर आई-वडीलांची परवानगी घेण्यास सांगतात. जेव्हा राष्ट्रपाल आई-वडीलांना परवानगी मागण्यास जातो. म्हणजेच आई-वडीलांची परवानगी घेण्यास जातो तेव्हा ते राष्ट्रपालाला परवानगी देत नाहीत. तेव्हा राष्ट्रपाल जमिनिवर पडून जातो व आई-वडीलांना म्हणतो की एकतर मला इथे मरण येईल किंवा मला प्रव्रज्जा प्राप्त होईल. राष्ट्रपालाचे मित्र देखील त्याला समजविण्याचा खूप प्रयत्न करतात. परंतु तो कुणाचेही ऐकण्यास तयार नसतो. शेवटी राष्ट्रपालचे मित्र राष्ट्रपालच्या आई-वडीलांनाच म्हणतात की, जर त्यांनी राष्ट्रपालला प्रव्रजित होण्याची परवानगी दिली तर प्रव्रज्जित झाल्यावरसुद्धा ते त्याला जीवंत पाहू शकतील तेव्हा राष्ट्रपालचे आई-वडील त्याला एका अटीवर परवानगी देण्यास तयार होतात. ती

Page No.:
Date :

अर म्हणजे प्रव्रज्जित झाल्यावर त्याने माता-पित्याला भेटावे.

त्यानंतर राष्ट्रपाल भगवान बुद्धांकडे जातो व त्यांना सांगतो की, आई-वडिलांनी मला प्रव्रज्जित होण्याची परवानगी दिलेली आहे. तेव्हा तो भगवंताकडून प्रव्रज्जा व उपसंपदा प्राप्त करून भिक्खू झाल्यानंतर धम्मा-चे पालन योग्य रीतीने करून अर्हत झाला. एके दिवशी भगवंतांची आज्ञा घेऊन तो थुल्लकोट्ठित येथे सकाळी पोचतो. चारिकेकरिता तो आपल्या वडिलांच्या घरासमोर पोचतो. त्याचे पिता त्याला दुरूनच येतांना बघतात परंतू त्याला ओळखत नाही. या श्रमणांनीच माझ्या एकुलत्या एक पुत्राला प्रव्रज्जित केले असा राग मनात असल्यामुळेच राष्ट्रपालला तेथे अन्नदान न मिळता फटकारच मिळाली. त्यावेळीच त्या घरातील दासी शिळी दाळ फेकण्यासाठी बाहेर येते तेव्हा आयुष्यमान राष्ट्रपाल त्या दासीला ती दाळ आपल्या पात्रात टाकण्यास सांगतो. दासी त्याच्या जवळ दाळ देण्यासाठी जाते तेव्हा ती राष्ट्रपालला ओळख-ते आणि घरात जाऊन त्याच्या आईला सांगते तेव्हा त्याचे आई-वडील राष्ट्रपालच्या पुर्व-पत्नींना अलंकृत करून होऊन समोर येण्यास सांगतात. तसेच त्याला सोन्याच्या नाण्यांचे आमिष दाखवतात. त्याच्या पुर्वपत्नी देखील त्याला विचारतात की, कोणत्या अप्सरांना प्राप्त करण्यासाठी राष्ट्रपाल ब्रह्मचर्याचे पालन करत आहे. तेव्हा राष्ट्रपाल त्यांना म्हणतो की, बहिणींनो ! अर्हत व्यक्ती अप्सरांना प्राप्त करण्यासाठी ब्रह्मचर्याचे पालन करीत नाही. हे सर्व घडल्यानंतर आयुष्यमान राष्ट्रपाल त्याच्या आईवडीलांना म्हणतो की, भोजन द्यायचे असेल तर द्या, मला कष्ट देऊ नका.

Page No.
Date :

तेव्हा आयुष्यमान राष्ट्रपाल भोजन झाल्-नंतर गाथेतून उपदेशीत करतात. तो म्हणतो की, हे हाड-मासांचे शरीर केवळ वस्त्रांमुळेच शोभून दिसते. अलंकृत शरीराला मुखाला मोहीत करु शकते परंतु मी या मृगजळात अडकणार नाही.

अशाप्रकारे रठ्ठपाल त्यांना उपदेशीत करुन तेथून निघून जातो.

बोध : रठ्ठपाल सुत्त हे मज्झिम निकाय या ग्रंथातून घेतलेले असून यात प्रव्रजित होण्याचे महत्त्व सांगितले आहे.

प्र.२रा भिक्खुवग्गो च्या सारांश लिहा.

उत्तर: संदर्भ : भिक्खुवग्गो हा धम्मपद या ग्रंथातून घेतलेला असून भिक्षुंच्या नियमांविषयी सांगितलेले आहे. आणि त्यांच्या कर्तव्यांविषयी सांगितले आहे.

१) चक्खुना संवरो साधु साधु सोतेन संवरो।
घाणेन संवरो साधु साधुजिव्हाय संवरो ।।१।।

अर्थ: भिक्षुंकरिता डोळ्यांवर संयम असणे, कानावर संयम असणे, नाकावर संयम असणे आणि जिभेवर संयम असणे चांगले आहे.

२) कायेन संवरो साधु साधु वाचाय संवरो।
मनसा संवरो साधु साधु सब्बथ संवरो।
सब्बथ संवुतो भिक्खु सब्बदुक्खा पमुच्चति ।।२।।

अर्थ: भिक्षुंकरिता शरीर, वाणी, मन आणि सर्व इंद्रियांवर संयम असणे चांगले आहे. अशाप्रकारे सर्व ठिकाणी संयमित असलेला भिक्षु सगळ्या दुःखातून मुक्त होतो.

Page No.
Date :

३) हत्थसञ्ञतो पादसञ्ञतो वाचाय सञ्ञतो सञ्ञतुत्तमो
अज्झत्तरतो समाहितो एको सन्तुसितो तमाहु भिक्खुं ॥३॥
अर्थ: हातांवर, पायांवर आणि वाणीवर योग्य प्रकारे नियंत्रण असलेला भिक्षु एकटा राहत असतांना सुद्धा अध्यात्मामध्ये संतुष्ट असतो आणि तोच योग्य भिक्षु म्हटल्या जातो.

४) यो मुखसञ्ञतो भिक्खु मन्तभाणी अनुद्धतो।
अत्थं धम्मञ्च दीपेति मधुरं तस्स भासितं ॥४॥
अर्थ: जो भिक्षु वाणीवर नियंत्रण ठेवतो, आपली गोष्ट थोडक्यात सांगतो, जो विनम्र असतो आणि धम्माच्या अर्थाला तो योग्य प्रकारे प्रकाशित करतो त्याचे भाषण ऐकण्यासाठी मधुर वाटते.

५) धम्मारामो धम्मरतो धम्म अनुविचिन्तयं।
धम्मं अनुस्सरं भिक्खु सद्धम्मा न परिहायति ॥५॥
उत्तर धम्मामध्ये निरंतर रमणारा, धम्माचे पुनः पुनः चिंतन करणा-
-रा धम्माचे अनुसरण करणारा भिक्षु सद्धर्मापासून कधीही पराजित होत नाही.

६) सलाभं नातिमञ्ञेय्य नाञ्ञेसं पिहयं चरे।
अञ्ञेसं पिहयं भिक्खु समाधिं नाधिगच्छति ॥६॥
अर्थ: आपल्याजवळ जे आहे त्याला कमी लेखू नये, इतरांकडे जे आहे त्याविषयी ईर्षा करू नये. दुसऱ्यांची ईर्षा करणारा भिक्षु कधी-
-ही मनाची एकाग्रता प्राप्त करू शकत नाही.

SEAL

७) अप्पलाभोपि चे भिक्खु सलाभं नातिमञ्ञति।
तं वे देवा पसंसन्ति सुद्धाजीविं अतन्दितं ॥७॥
अर्थ: भिक्षुकडे थोडेजरी असले तरी तो त्याची अवहेलना करीत

नाही अशा शुद्ध आजिविका करणाऱ्या, आळसरहित भिक्षुंची देवता लोक सुद्धा प्रशंसा करतात.

८) सब्बसो नामरूपस्मिं यस्स नत्थि ममायितं ।
असता च न सोचति स वे भिक्खूति वुच्चति ।।८।।

अर्थ : संपूर्ण संसारामध्ये जो नाम आणि रुपाविषयी जो भिक्षु थोडी देखिल ममता ठेवत नाही तसेच नाम आणि रुप नष्ट झाल्यावर जो दुःखही करत नाही तोच योग्य भिक्षु म्हटल्या जातो.

९) मेत्ताविहारी यो भिक्खु पसन्नो बुद्धसासने ।
अधिगच्छे पदं सन्तं संखारुपसमं सुखं ।।९।।

अर्थ : जो भिक्षु मैत्रिभावनेने जिवन जगतो विहार करतो किंवा विच-रण करतो जो बुद्धाच्या शासनामध्ये प्रसन्न राहतो तो भिक्षु संस्कारांना नष्ट करून शांत व सुखमय पदाला प्राप्त होतो.

१०) सिञ्च भिक्खु ।इमं नावं सित्ता ते लहुमेस्सति ।
छेत्वा रागञ्च दोसञ्च ततो निब्बानमेहिसि।। १०।।

अर्थ: जेव्हा एखाद्या नावेतील पाणी उपसून टाकल्यावर किंवा बाहेर फेकल्यावर ती नाव हल्की होऊन वेगाने चालते त्याचप्रमाणे जर भिक्षुंनी स्वतःच्या मनातील राग आणि द्वेष काढून टाकला तर ते निर्वाण पदाला प्राप्त करु शकतात.

११) पञ्च छिन्दे पञ्च जहे पञ्च चुत्तरि भावये ।
पञ्च सङ्गातिगो भिक्खु ओघतिण्णोति वुच्चति ।।११।।

अर्थ: पाच बंधनांना तोडावे, पाच बंधनांना सोडून द्यावे, आणि पाच श्रद्धादी इंद्रियांची भावना करावी, पाच चित्त विका-

रांच्या पलिकडे गेलेल्या भिक्षुला ओघतरून असे म्हणतात.

१२) झाय भिक्खु । मा च पमादो
मा ते कामगुणे भमस्सु चित्तं ।
मा लोहगुलं गिली पमत्तो
मा कन्दि दुक्खमिदन्ति डय्हमानो ॥१२॥

अर्थ : भिक्षुंनी ध्यान करावे, भिक्षुंनी नेहमी सावध रहावे, त्यांनी आपले चित्त कामगुणापासून अलिप्त ठेवावे. बेसावध असणारा भिक्षु हा त्याचप्रमाणे दुःखी होतो ज्याप्रमाणे एखादा व्यक्ती लोखंडाचा तप्त गोळा गिळंकृत केल्यावर दुःख प्राप्त करतो.

१३) नत्थि झानं अपञ्ञस्स पञ्ञा नत्थि अज्झायतो ।
यम्हि झानञ्च पञ्ञा च स वे निब्बानसन्तिके ॥१३॥

अर्थ : प्रज्ञारहित पुरूषाला ध्यान प्राप्त होत नाही आणि ध्यान न करणाऱ्याला प्रज्ञा प्राप्त होत नाही. ज्याच्याजवळ ध्यान आणि प्रज्ञा या दोन्ही गोष्टी आहेत तोच भिक्षु निर्वाणाच्या जवळ असतो.

१४) सुञ्ञागारं पविट्ठस्स, सन्तचित्तस भिक्खुनो ।
अमानुसी रती होती सम्माधम्मं विपस्सतो ॥१४॥

अर्थ: शुन्यागारामध्ये प्रवेश केलेला शांत चित्त भिक्षु योग्य प्रकारे धम्माची विपश्शना करून दिव्य आनंदाला प्राप्त करतात.

१५) यतो यतो सम्मसति खन्धानं उदयब्बयं ।
लभति पीतिपामोज्जं अमतं तं विजानतं ॥१५॥

अर्थ: मनुष्य जसा जसा स्कंधांच्या उत्पत्ती आणि विनाशाचा विचार करतो तस-तसे त्याला प्रिती आणि प्रसन्नता रूपी

Page No.
Date :

अमृत प्राप्त होत असते.

१६) तत्रायमादि भवति इध पञ्ञस्स भिक्खुनो ।
इन्द्रियगुत्ति सन्तुट्ठि पातिमोक्खे च संवरो ॥१६॥
अर्थ: या धम्मामध्ये प्रज्ञावान भिक्षुंना इंद्रियांची रक्षा करणे, समाधानी असणे आणि प्रातिमोक्षांच्या नियमांचे पालन करणे आवश्यक असते.

१७) मित्ते भजस्सु कल्याणे सुद्धाजीवे अतन्दिते ।
पटिसन्थारवुत्तस्स आचारकुसलो सिया ।
ततो पामोज्जबहुलो दुक्खस्सन्तं करिस्सति ॥१७॥
अर्थ: शुद्ध मार्गाने उपजिविका करणाऱ्या जागृत मित्रांची संगती, सेवा सत्कार करण्याची वृत्ती योग्य प्रकारे शिलाचे पालन या सगळ्या गोष्टींमुळे भिक्खु दुःखाचा अंत करू शकतात.

१८) वस्सिका विय पुप्फानि मद्दवानि पमुच्चति ।
एवं रागञ्च दोसञ्च विप्पमुञ्चेथ भिक्खवो ॥ १८ ॥
अर्थ: ज्याप्रमाणे जाईची वेल कोमेजलेल्या फुलांना गाळून देते त्याचप्रमाणे भिक्षुंनी आसक्ती आणि द्वेशाचा पूर्णपणे त्याग करावा.

१९) सन्तकायो सन्तवाचो सन्तमनो सुसमाहितो ।
वन्तलोकामिसो भिक्खु उपसन्तोति वुच्चति ॥१९॥
अर्थ: ज्याचे शरीर, वाणी आणि मन शांत आहे जो योग्य प्रकारे समाधानी आहे आणि ज्याने सांसारिक प्रलोभनांचा त्याग केलेला आहे. अशा भिक्षुला उपशांत म्हणतात.

SEAL

२०) अत्तना चोदयत्तानं पटिवासे अत्तमत्तना
सो अत्तगुत्तो सतिमा सखं भिक्खु विहाहिसि ॥२०॥
अर्थ : आपण स्वतःच स्वतःला प्रेरणा द्यावी, आपणच स्वतः स्वतःची तपासणी करावी अशाप्रकारे आत्मसंरक्षित स्मृतीमान भिक्षु सुखाने विहार करतात.

२१) अत्ता हि अत्तनो नाथो अत्ताहि अत्तनो गति ।
तस्मा सञ्ञमयत्तानं अस्सं भद्रं व वाणिजो ॥२१॥
अर्थ : आपणच आपले स्वामी आहोत, आपणच आपली गती आहोत. ज्याप्रमाणे जातीवंत घोड्याला व्यापारी ताब्यात ठेवतो त्याप्रमाणे भिक्षुंनी स्वतःवर संयम ठेवावा.

२२) पामोज्जबहुलो भिक्खु पसन्नो बुद्धसासने ।
अधिगच्छे पदं सन्तं संखारूपसमं सखं ॥२२॥
अर्थ : जे भिक्षु आनंदित असतात, बुद्धशासनामध्ये प्रसन्न असतात. तेच भिक्षु संस्कारांना नष्ट करून शांत सुखमय पदाला प्राप्त करतात.

२३) यो हवे दहरो भिक्खु युञ्जति बुद्धसासने ।
सो इमं लोकं पभासेति अब्भा मुत्तोव चाद चन्दिमा ॥
अर्थ : जो तरुण भिक्षु बुद्धशासनामध्ये स्वतःला जोडतो तो ढगातून मुक्त झालेल्या चंद्राप्रमाणे या जगाला प्रकाशित करतो.

बोध : अशाप्रकारे भिक्खुवग्गामध्ये आदर्श भिक्षु कसा असावा याविषयी माहिती सांगितलेली आहे.

SEAL

Page No.
Date :

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce Colle,
Sneh Nagar, Nagpur-15

SEAL